## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०३ / २०११.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १२ / ०८ / २०११.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०३, सोमवार दिनांक २२ / ०८ /२०११.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती. ...........................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक २२/०८/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता "जुने महानगरपालिका सभागृह",** अहमदनगर महानगरपालिका येथे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका.
२. प्रस्तावाची टिप्पणी.
३. मागील सभा क्र.४ दि.२९/०३/२०११ (बजेट)
व सभा क्र.५ दि.२९/०३/२०११ रोजीचे इतिवृत्त.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**सभा क्रमांक ०३**

सोमवार  दिनांक २२ / ०८ /२०११ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची

विषय पत्रिका.

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| ४ | मागील सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २९/०३/२०११ सन २०११-२०१२ सालचे अंदाजपत्रकीय सभा  व  सभा क्रमांक ५ मंगळवार दिनांक  २९/०३/२०११ रोजीचे सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| ५ | दुखवट्याचा प्रस्ताव. |
| ६ | मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमसीओ १२११/प्र.क्र.१४/नवि-१४ दिनांक २८ मार्च २०११ अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आकृतीबंधात " अतिरिक्त आयुक्त " या पदाचा समावेश करणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| ७ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत लाभ देण्याकरीता पुरवणी सर्वेक्षणाव्दारे तयार करण्यात आलेली दारिद्रिय रेषेखालील कुटुंबांची यादी मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे व मा.राज्य नागरी विकास यंत्रणेकडे पाठविण्यापुर्वी मा. सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणुन देणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| ८ | अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय व संशोधन केंद्रास अनुदान देणे बाबत  प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर  विचारविनिमय करुन निर्णय घेणे. (दि.२५/०३/२०११) |
| ९ | अहमदनगर महानगरपालिका स्थायी समितीचे सदस्य मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.गणेश भोसले, मा.सौ.मुक्ता मिसाळ, मा.श्री.सुभाष लोंढे व मा.सौ.सुमनताई गंधे यांचे दिनांक १३/०७/२०११ रोजीचे पत्रानुसार मा.महिला व बालकल्याण समितीचे विसर्जन करणेकरीता प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर  विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १० | मा.सदस्यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर साो, यांचे मान्यतेने.
दिनांक :  १२/०८/२०११.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ४** **दिनांक : २२/०८/२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** मागील सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २९/०३/२०११ सन २०११-२०१२ सालचे अंदाजपत्रकीय सभा व सभा क्रमांक ५ मंगळवार दिनांक २९/०३/२०११ रोजीचे सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** मागील सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २९/०३/२०११ सन २०११-२०१२ सालचे अंदाजपत्रकीय सभा व सभा क्रमांक ५ मंगळवार दिनांक २९/०३/२०११ रोजीचे सभांचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा. महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

--**--

**चर्चा :-**

**मा.दिलीप सातपुते :-** मागील दिनांक २९/०३/२०११ चे इतिवृत्त मंजूर करतांना वॉर्ड विकास निधी ३.०० लाख, महापौर निधी ३.५० कोटी, उपमहापौर निधी २५.०० लक्ष, सभापती स्थायी समिती २५.०० लक्ष या प्रमाणे इतिवृत्तात दुरुस्ती करुन विषय मंजूर करणेत यावा.

**मा.महापौर साो :-** श्री.दिलीप सातपुते, नगरसेवक यांचे पत्राप्रमाणे इतिवृत्तामध्ये दुरुस्ती करणेत यावी व त्यासह इतिवृत्त कायम करणेत यावे.

**मा.श्री.निखील वारे :-** इतिवृत्तात बदल करता येतो का ?

**मा.आयुक्त साो :-** मा.सदस्यांनी सूचना मांडली त्यानुसार चर्चा झाल्यानंतर निर्णय घेणे मा.सभागृहाने घ्यावयाचा आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** मा.स्थायी समिती व जनरल बोर्डात एकदा अंदाजपत्रकास मंजूरी दिली असतांना आता त्यात बदल करता येतो का ?

**मा.श्री.संदीप कोतकर :-** सूचना मांडण्यापूर्वी बदल करता येतो का हे अगोदर सांगा मग आम्ही आमच्या सूचना मांडतो बदल जर करता येत नसेल तर सूचना मांडून काय उपयोग.

**मा.आयुक्त साो :-** विषय हा मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे करीताचा आहे. तो दुरुस्तीसह मंजूर करता येईल किंवा जसा आहे तसा मंजूर करता येईल.

**मा.श्री.संजय चोपडा :-** अंदाजपत्रकाच्या प्रती अजून नगरसेवकांना मिळालेल्या नाहीत आपण आपले अधिकार दुस-याला का देता अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी मुंबईला पाठविल्याचे समजले. सुवर्ण जयंती शहरी योजनेतील १५ कामांची काय सद्यस्थिती आहे. अजुनही टेंडर प्रोसेस नाही. सदरची कामे नागरिकांना केंव्हा आपण उपलब्ध करुन देणार याबाबत प्रशासनाने खुलासा करावा नगरोत्थान योजनेसाठी ७० कोटीचा निधी मंजूर झाला असून मनपा हिस्सा १० % लोक वर्गणी याकरीता भरावी लागणार आहे. यासाठी काय तरतूद केली याबाबतही खुलासा करावा.

**शहर अभियंता :-** नगरोत्थान योजने अंतर्गत ७० कोटीचे प्रस्तावास मंजूरी मिळाली आहे डी.पी.आर तयार केला आहे. तांत्रिक मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासनाची मंजूरी आल्यानंतर प्रस्तावावर संबंधित विभागाकडुन कोणतीच कारवाई केली नाही.

**मा.श्री.संजय चोपडा :-** चितळे रोड विकसीत करणेची बाब महत्वाचे आहे महानगरपालिकेस त्यापासुन मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळू शकेल कर्मचारी अधिकारी यांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** बजेट मंजूर होवून ४ महिने झाले तरी बांधकाम विभागात अजुन त्याची प्रत का मिळाली नाही. मा.शासनाकडून मंजूरी केंव्हा येणार या अगोदर बजेट शासनाकडे कधीही पाठविले नाही मग आत्ताच का पाठविले याबाबत खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :-** मा.शासन निर्णय व परिपत्रकातील तरतूदीनुसार मा.शासनाचे मार्गदर्शन मागविणेसाठी पत्र देण्यात आले आहे.

**मा.आयुक्त साो :-** सन्माननीय सदस्यांच्या शंकेबाबत प्रथम खुलासा करतो की, अंदाजपत्रक मंजूरीसाठी मा.शासनाकडे पाठविलेले नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये स्वेच्छानिधी ठेवण्याची तरतुद नाही. तसेच मा.महापौर निधी, मा.स्थायी समिती सभापती निधी, मा.उपमहापौर निधी बाबत उपमहालेखाकार यांनी या निधीबाबत आक्षेप घेतला असून स्वेच्छानिधी हा एकुण उत्पन्नाच्या २ टक्के एवढाच ठेवता येतो अशी तरतूद असल्याने तसेच त्यांनी महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची कारणे दिली आहेत. दुसरी गोष्ट मा.शासनाचे मार्गदर्शन आल्यानंतर सदस्यांच्या सुचने प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

अंदाजपत्रकातील मंजूरीनुसार ५०% नगरसेवक निधीचे काम करण्याचे आदेश यापूर्वीच दिलेले आहेत. तसेच इतर बाबतीतही यापुर्वी आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत नगरसेवक निधी रिलीज केलेला आहे. संबंधितांनी जर या प्रकरणी कार्यवाही केली नसेल तर सात दिवसामध्ये कारवाई करणेबाबतचे आदेश देण्यात येत आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** बजेट रजिष्टर नियमानुसार आहे का ते सांगा ?

**शहर अभियंता :-** जा.क्र.अर्थ १७९ दिनांक १७/०६/२०११ अन्वये प्रशासकीय ऑर्डर नुसार ५० % निधीचे प्रस्ताव तयार करण्याचे आदेश संबंधित अभियंत्यांना देण्यात आले आहेत. २ लाखापर्यंत प्रस्ताव मंजूर करणेबाबत संबंधितास आदेश दिले आहेत. मा.नगरसेवकांचा एकही प्रस्ताव प्रलंबित नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** महानगरपालिका फंड चालू झालेला नाही.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आम्ही दोन लाख घेणार नाही दोन लाख रुपयात कशी कामे करणार प्रभागात नागरीकांच्या रोषास आम्हाला सामोरे जावे लागते. आम्ही कामे सूचवू त्यास तुम्ही मंजूरी द्यावी.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** मा.आयुक्त साो यांची मागे सर्व नगरसेवकांनी भेट घेतली त्यावेळी ४ लाख रुपया पर्यंतची कामे मंजूर करण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले.

**मा.श्री.निखिल वारे :-** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीमुळे नगरसेवक निधी मध्ये कपात केलेली आहे. महानगरपालिकेचे किती पदाधिकारी, अधिकारी महानगरपालिके मार्फत देण्यात येणारी वाहने वापरतात त्यापोटी मासिक किती रक्कम अदा करण्यात येते त्याची माहिती द्यावी. महानगरपालिकेतील किती अधिकारी, पदाधिकारी यांना वाहन वापरणेस अनुज्ञेय आहे. दहा हजाराच्या मंजुरीसाठी अधिकारी १६ हजार भाडयाचे वाहन वापरतात.

**मेकॅनिकल इंजिनिअर :-** महानगरपालिके मार्फत आठ अधिका-यांना वाहन वापरण्याची मंजूरी असून त्यामध्ये चार प्रभाग अधिकारी, १ नगररचनाकार, १ आरोग्य अधिकारी, १ मुख्यलेखाधिकारी, १ सहाय्यक आयुक्त यांचा समावेश आहे. प्रत्येक महिन्याला सर्व गाडयावर सरासरी १ ते सव्वा लाख रुपये खर्च येतो.

**मा.आयुक्त सो :-** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती विचारात घेता वाहनाच्या वापराबाबत अत्यावश्यकता पाहून आढावा घेवून आवश्यकता नसल्यास वाहने बंद करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अधिका-यांना महानगरपालिकेतर्फे मोबाईल सेवा पुरविण्यात आली आहे त्यांचे मोबाईलचे आतापर्यंत किती बील महानगरपालिकेने भरले. अधिकारी हे स्वत: पगारातून खर्च करण्यास सक्षम आहेत. मोबाईल सेवेबरोबरच इतरही इंटरनेट सुविधा त्यांना वापरता येतात यावर अनावश्यक खर्च होतो तो कमी करावा.

**मा.आयुक्त सो :-** महानगरपालिकेच्या अधिका-यांना मोबाईल सेवे बरोबर असलेले इंटरनेट वापरणेची सुविधा १ महिन्यापासून बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मोबाईल बील कमीत कमी येण्याचे दृष्टीने प्रयत्न केले जातील.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** बजेटच्या विषयाला भरपूर सविस्तर चर्चा झाली असून यानंतर पुढचा विषय चर्चेसाठी घेण्यात यावा.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** बजेटचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत मा.महापौर यांनी रुलिंग द्यावे.

**मा.महापौर सो :-** इतिवृत्त मंजूर करणेबाबत मा.सदस्य श्री.सातपुते यांनी सूचविल्यानुसार मंजूरी देत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**मा.श्री.संदीप कोतकर :-** सभेच्या कामकाजाचे रेकॉर्डींगची प्रत आम्हाला देण्यात यावी व या विषयावर मतदान घेण्यात यावे. नगरसेवक निधी १५ लाख करावा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** नगरसेवक निधी व वॉर्ड विकास निधी यामध्ये एक रुपया सुध्दा कमी घेणार नाही. प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांना बोलावून घ्या सर्वानुमते तो निर्णय होईल. त्यानंतर पुढचा विषय घ्यावा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** इतिवृत्ताचा विषय तहकूब ठेवता येणार नाही. निर्णय घ्यावा लागेल.

**मा.महापौर सो :-** विचार विनिमय करणेकामी १५ मिनीटांचा वेळ देण्यात येत आहे.

**मा.आयुक्त सो :-** सन २०११-२०१२ चे अंदाजपत्रकातील काही बाबीबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागविले आहे. या व्यतिरिक्तच्या विषयाबाबत कार्यवाही करण्यात यावी उत्पन्ना पेक्षा खर्च अधिक असल्याने खर्च पेलणारा नसल्याने मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. सन्माननीय सातपुते यांनी कपातीची जी सूचना मांडली त्यानुसार महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्याने शासनाकडे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. महासभेला डावलून कोणतीही कृती करण्याचा प्रशासनाचा उद्देश नाही. सर्व बाजूने कपातीचे धोरण अवलंबणेत येत आहे. ज्या कामाची वर्क ऑर्डर झालेली नाही अशा २ कोटी ४० लाख कामाचे प्रस्ताव रद्द केलेले

आहेत. आजही वीज बील, कर्मचा-यांचे पगार व देयके यावरील खर्च भागविण्यासाठी निर्णय घेण्यात आला.

सन्माननीय नगरसेवकांच्या हक्कावर गदा येईल असा कोणताही प्रयत्न केलेला नाही. कुणाचाही निधी कमी केलेला नाही. महासभाही अंतीम आहे. आम्ही शासनाला स्मरणपत्र देवू शासन निर्णय देईल किंवा नाही याबाबत मी सभागृहास निवेदन करीत नाही.

**मा.श्री.संदीप कोतकर :-** एक कोटी रुपयांचे अनुदान मुलभुत सोयी सुविधा अंतर्गत महानगरपालिकेस नुकतेच प्राप्त झाले आहे. परंतु महानगरपालिकेने त्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही. एकीकडे आर्थिक परिस्थिती खराब आहे असे निवेदन करायचे व दुसरीकडे निधी उपलब्ध होवुनही त्यावर काहीच कार्यवाही करायची नाही असे महानगरपालिकेचे धोरण आहे.

**मा.आयुक्त सो :-** सदरचे अनुदान हे टप्प्या टप्प्याने प्राप्त होत असते त्यानुसार १ कोटी निधी प्राप्त झालेला आहे. प्रस्ताव तयार केले आहेत.

**मा.श्री. संदीप कोतकर :-** मा.श्री.गणेश भोसले यांनी जी माहिती सभागृहात दिली त्यानुसार ५००० बांधकाम परवानगी घेण्यात आल्या परंतु कंम्प्लीशन घेतलेले नाही. घरपट्टीची ८० कोटी थकबाकी आहे. घरपट्टी बाबत वनटाईम सेटलमेंटची स्कीम राबवुन घरपट्टी वसुलीचा निर्णय घेण्यात यावा. मागील सभेमध्ये आम्ही काही सूचना मांडल्या फिरते शौचालय नादुरुस्त आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभिकरण, आरोग्य कर्मचा-यांकरीता गमबूट खरेदी यावर फक्त महासभेत चर्चा होते परंतु कार्यवाही मात्र होतांना दिसत नाही. रेखांकन मंजूर करतांना संबंधितांकडून ड्रेनेज, लाईट व रोडचे पैसे भरुन घेणे बाबतही कार्यवाही होत नाही. इलेक्ट्रीक विभागाकडे शिडी असणारी एक गाडी आहे ती नादुरुस्त आहे. याकरीता आम्ही दुस-या वाहनावर व्यवस्था करणेबाबत सूचना केली ती अंमलात आल्यास प्रश्न सुटू शकेल. ४० हजार वरील वैद्यकीय कर्मचारी प्रतिपूर्ती बाबत निर्णय घेणेबाबत मा.आयुक्त यांनी आश्वासन दिले परंतु त्या बाबतही कार्यवाही झालेली नाही. अधिका-यांना काम करायचे नसेल तर तसे त्यांनी सांगावे आम्ही त्यांच्या बदलीसाठी प्रयत्न करु

**मा.आयुक्त सो :-** वॉर्ड विकास निधी आम्ही दिलेला आहे असे सौ.खरमाळे मॅडम यांचे निवेदन आहे. वास्तविक हा निधी महासभेने ठरविलेला आहे. वॉर्ड विकास निधीची महासभेने तरतूद केली आहे. प्रशासनाने तो शून्य तरतूद दर्शविली होती.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** नागरीकांना महानगरपालिकेच्या वित्तीय परिस्थितीचे काही देणे घेणे नाही. त्यांचे म्हणणे आम्ही घरपट्टी- पाणीपट्टी भरतो आम्हाला सुविधा मिळाल्या पाहीजेत.

**मा.आयुक्त सो :-** कर्मचा-यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती बाबत आम्ही कार्यवाही करणार आहोत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** २००९ मधील फेरीवाल्यांचे सर्व्हेनुसार बरी वसुली झाली तरी पालिकेचे उत्पन्न वाढू शकते. नविन बांधकामावर आकारणी केल्यास उत्पन्न वाढू शकते बोगस नळ कनेक्शन सर्व्हे मधून कोटी रुपये मिळतील. घरपट्टी वसुली बाबत लोक न्यायालयाचे माध्यमातून तडजोडीने प्रकरणे निकाली काढल्यास पालिकेस मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळू

शकते महानगरपालिकेच्या गाळे धारकांकडून डिपॉझिट व भाडयात वाढ करुन उत्पन्न मिळू शकते. वॉर्ड विकासाच्या बाबतीत कपात करण्यात येवू नये.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आता आहे तसे बजेट मंजूर करुन टाका शासनाचा ज्यावेळी निर्णय होईल त्यानुसार पुढे कार्यवाही करावी.

**मा.महापौर सो :-** सर्व सदस्यांनी आपल्या लेखी सूचना द्याव्यात त्याची नोंद घेतली जाईल त्याप्रमाणे या विषयावर कार्यवाही करण्यात येईल. मा.सदस्यांनी मतदानाची मागणी केली आहे. महत्वाचा विषय असल्याने एकमताने निर्णय घ्यावा सर्वांच्या भावना विचारात घेता हे इतिवृत्त कायम करु

**मा.श्री.संदीप कोतकर :-** अंदाजपत्रक आहे तसेच कायम ठेवून मंजूर केल्याबद्दल मा.महापौर यांचे अभिनंदन करतो.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** दैनिक सकाळ मधील बातमी "प्रशासन सापडले कात्रीत " याबाबत खुलासा करावा. ठेकेदारांचे चेक निघाले नाहीत सर्वांना थोडे थोडे चेक द्या पहिले गोरगरीब ठेकेदारांचे पैसे द्या.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया बाबत तरतूद केलेली नाही. मागील सभेत यावर चर्चा झाली कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया करणा-या महिलांना मदत देण्यात येईल याबाबत तरतूद न करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी.

**मुख्यलेखाधिकारी :-** सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात आर.सी.एच. अंतर्गत कुटुंब कल्याण या हेडवर रु २.०० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. या निधीतुन कुटुंब नियोजन शस्त्रक्रीयेवर खर्च करण्यांत येत आहे.

**मा.महापौर सो :-** कर्मचा-यांचे पगार व दिवाळीचा बोनस देणे आवश्यक असल्याने यापूर्वीच मी आपणांस पत्र दिले आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** चेक निघतील त्यापैकी ६० टक्के चेक सेनेच्या नगरसेवकांच्या ठेकेदारांचे व ४० टक्के भाजपच्या नगरसेवकांच्या ठेकेदारांचे निघणार अशा प्रकारे चर्चा चालू आहे. या प्रमाणे होणार असेल तर मनसे व इतर पक्षांच्या नगरसेवकांच्या वॉर्डातील विकास कामे करण्याकरीता कोणतेही ठेकेदार कामे घेणार नाहीत. अशा पध्दतीने निर्णय घेवू नये.

**मा.महापौर सो :-** सर्वांनी मिळून काम करायचे आहे. कोणताही भेदभाव नाही.

**मा.आयुक्त सो :-** चेक अदा करण्याबाबत सिनियॉरीटी लावण्याचा निर्णय घेण्यात आला ज्या कामाबाबत तक्रारी आहेत तसेच देयक थांबविण्याबाबत आदेश देण्यात आलेल्या अशा बीलासाठी ही पध्दत नाही. अशा ठेकेदारांना बिले दिले जाणार नाही. या पध्दती मध्ये २.०० लक्ष रुपये पर्यंत देयक असलेल्या ठेकेदारांना १००%, ५.०० लक्ष पर्यंत देयक असल्यास दोन टप्प्यात, १०.०० लक्ष रुपये देयक असल्यास तीन टप्प्यात तर त्यापुढील देयक असल्यास चार टप्प्यात सिनियॉरिटी नुसार देयक अदा केली जातील. प्रशासकीय निर्णयाची अंमलबजावणी करतांना या ठिकाणी ठरवुन घेवू तसे असेल तरच निर्णय होवू शकतो.

**मा.श्री.सचिन पारखी :-** मा.शासनाने ठेकेदाराची जाती निहाय यादी केली आहे काय ?

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** गोरगरीब ठेकेदारांचे चेक अगोदर काढा.

**मा.आयुक्त सो :-** गरीब ठेकेदाराची सीमारेषा नसते २५ हजारापर्यंत सिनियॉरिटी लावण्यात आलेली नाही.

**मा.महापौर सो :-** एक लाख रुपयापर्यंत सिनियॉरिटी डावलून दिवाळी, ईद साठी त्या त्या ठेकेदारांचे चेक द्यावेत अशी माझी भावना आहे. अपवाद म्हणुन हा निर्णय घेण्यात यावा.

**मा.श्री.संदीप कोतकर :-** सभागृहातील फोटोवर जाळी जमा झाली आहे. साफसफाई बाबत संबंधितांना आदेश द्यावेत.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** नविन सभागृहाचे कामाची स्टेज काय आहे. ११६ कोटी पाणी योजनेचे काम कोणत्या स्टेजला आहे याबाबत माहिती द्या.

--**--

**ठराव :-** मागील इतिवृत्तावर झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार इतिवृत्त कायम करणेस ही सभा मंजुरी देत आहे. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक - मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ

अनुमोदक - मा.सौ.खरमाळे संगिता रत्नाकर

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ५** **दिनांक : २२ /०८ /२०११**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल डॉ.पी.सी.अलेक्झांडर यांचे बुधवार दिनांक १०/०८/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | ज्येष्ठ समाजसेविका साधनाताई आमटे यांचे शनिवार दिनांक ०९/०७/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द दिग्धर्शक मणी कौल यांचे बुधवार दिनांक ०६/०७/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | आंतरराष्ट्रीय किर्तीचे प्रसिध्द चित्रकार मुकबुल फिदा हुसेन (एम.एफ.हुसेन) यांचे शुक्रवार दिनांक १०/०६/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ५ | अहमदनगर शहरातील कलाध्यापक व प्रसिध्द चित्रकार अर्जुनराव तथा ए.जी.शेकटकर यांचे शुक्रवार दिनांक २२/०७/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | ज्येष्ठ संगीततज्ञ आणि प्रसिध्द शास्त्रीय संगीतकार डॉ.अशोक रानडे यांचे शनिवार दिनांक ३०/०७/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | प्रसिध्द म्युरल व स्टेनग्लास चित्रकार संजय चंद्रकांत दादरकर यांचे शुक्रवार दिनांक २३/०४/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा.सुरेश तेंडुलकर यांचे बुधवार दिनांक २२/०६/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | भारतीय किसान युनियनचे अध्यक्ष आणि उत्तर भारतातील शेतक-यांचे नेते महेंद्रसिंग टिकैत यांचे रविवार दिनांक १५/०५/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू यांचे बुधवार दिनांक ०४/०५/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | जिल्हा मराठा विद्या प्रसारकचे प्राध्यापक दिवटे सर यांचे शुक्रवार दिनांक २९/०४/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | साहित्यिक नारायण आठवले यांचे शुक्रवार दिनांक २९/०४/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १३ | गजानन महाराज, शेगांव यांच्या दिंडीतील वारकरी यांचा अपघाती मृत्यू झाला दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १४ | पुणे जिल्ह्यातील मावळ या गावातील शेतक-यांवर झालेल्या गोळीबारात मृत झालेल्या शेतक-यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

| | |
|---|---|
| १५ | मुंबई येथील बॉम्ब स्फोटात मृत्युमुखी पडलेल्या नागरीकांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १६ | महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आमदार रमेश वांजळे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १७ | समाजसेवक मामासाहेब हातवळणे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १८ | डॉ.रजनीकांत आरोळे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १९ | सामाजिक कार्यकर्ते अर्जुनराव कोतकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २० | प्रसिध्द मराठी गीतकार व कवी जगदीश खेबुडकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २१ | राकेश साहनी यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २२ | विवेक यशवंत भंडारे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ६** **दिनांक : २२ /०८ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमसीओ१२११/प्र.क्र.१४/नवि-१४ दिनांक २८ मार्च २०११ अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आकृतीबंधात " अतिरिक्त आयुक्त " या पदाचा समावेश करणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मुंबई यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : एमसीओ १२११/ प्र.क्र.१४/ नवि १४ दिनांक २८ मार्च २०११ अन्वये परिपत्रक देवुन "ड" वर्ग महानगरपालिकांसाठी " अतिरिक्त आयुक्त " हे पद आकृतीबंधामध्ये समाविष्ट करण्यांस येत आहे. याप्रमाणे नमुद करुन अहमदनगर महानगरपालिकासाठी अवर सचिव समकक्ष दर्जाचे १ पद मंजुर केले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे प्रारु प सेवा प्रवेश नियम / आकृतीबंध तयार करण्यांत येवुन मा.महासभेची मंजुरी घेवुन आस्थापना जा.क्र.१४६ दिनांक १८/०४/२०११ अन्वये मा.प्रधान सचिव (२) नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडेस अंतीम मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. सदर आकृतीबंधामध्ये " अतिरिक्त आयुक्त " या पदनामाचे पद प्रस्तावित करणेत आलेले नाही. मा.शासन निर्णय दिनांक ४ मे २००६ चे शासन निर्णयान्वये महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्या आधारे महानगरपालिका सेवांची ३ सेवेत विभागणी करुन ३८ अधिका-यांच्या पदांसाठी आकृतीबंध निश्चीत करणेबाबत मंजुरी देण्यांत आली. त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेचे "ड" वर्ग महानगरपालिकेत वर्गीकरण करण्यात आले असुन "ड" वर्ग महानगरपालिकांसाठी " अतिरिक्त आयुक्त" या पदांस मंजुरी देण्यांत आलेली नाही. त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रस्तावित आकृतीबंधा मध्ये " अतिरिक्त आयुक्त " या पदनामाचे पद प्रस्तावित करण्यांत आलेले नाही.

तथापि उपरोक्त शासन निर्णय विचारात घेता अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रारुप आकृतीबंधामध्ये " अतिरिक्त आयुक्त " या पदनामाचे पद प्रस्तावित करणे उचित व आवश्यक वाटते. सदरच्या पदावर मा.शासन निर्णय दिनांक २८ मार्च २०११ च्या सोबतचे परिशिष्ट विवरण पत्रानुसार मा.शासनाकडुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच सन १९४९ चा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९ अ (१) यामध्ये " राज्य शासनास महानगरपालिकेत महानगरपालिका अतिरिक्त आयुक्तांची एक किंवा अनेक पदे निर्माती करता येतील आणि अशा पदावर योग्य त्या व्यक्तींची नेमणुक करता येईल. " असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे प्रारु प आकृतीबंध / सेवा प्रवेश नियम मा.शासनाकडे अंतीम मंजुरीस्तव सादर करण्यांत आलेले असुन त्यामध्ये आस्थापनेवर " अतिरिक्त आयुक्त "

१ पद समाविष्ट करण्यास व सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेकरीता मा.महासभेची मंजुरीची आवश्यकता आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे मंजुरीसाठी पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त सो यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार सदरील विषय मंजुरीस्तव मा.महासभेपुढे ठेवण्यास मंजुरीस्तव सादर.

यावर आयुक्त सो यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

--**--

**चर्चा :-**

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** वॉलमन किती आहेत. बिगारी वॉलमनचे काम करतात त्यांना वॉलमनची वेतनश्रेणी देण्यात यावी. सहाय्यक आयुक्त या पदाबरोबर महानगरपालिकेतील इतरही पदांचे भरती बाबत विषय घेण्यात यावा.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** अति. आयुक्त नेमण्याची गरज काय आहे. शासन परिपत्रकात ८.०० लाख लोकसंख्येचा निकष आहे. अहमदनगरची लोकसंख्या ४.०० लाख असतांना हा विषय कसा घेण्यात आला.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** विषय क्रमांक ६ तहकुब ठेवुन पुढील विषय घेण्यांत यावा अशी मी सूचना मांडतो.

**मा.आयुक्त सो :-** अतिरिक्त आयुक्त या पदास मान्यता घेण्याबाबतचा विषय आहे. सदर पद भरतांना महानगरपालिकेचा ठराव आहे कि नाही हे पाहुनच निर्णय घेणार आहे. भविष्यकालीन तरतुदीसाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. पगार व वाहनावर येणारा खर्च व इतर बाबींचा विचार करुन आपण निर्णय घ्यावा. अगोदर तरतूद नव्हती आता तरतूद करुन अतिरिक्त आयुक्त पद निर्माण करुन ठेवण्यासाठी सुधारणा केली आहे.

**मा.श्री.संजय चोपडा :-** स्टॅपिंग पॅटर्नला मंजूरी मिळालेली नाही. याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त सो :-** शासन स्तरावर पाठपुरावा चालू आहे.

**मा.श्री.संजय चोपडा :-** अतिरिक्त आयुक्त पद भरतांना मुख्याधिकारी केडरमधील अधिकारी यांची नेमणुक करावी. महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करतांना मा.शासनाकडील अधिकारी घेवू नयेत. अशा प्रमाणे ठराव करुन पाठविण्यात यावा. अतिरिक्त आयुक्त आणण्यापेक्षा वॉलमन, फिटर, वायरमन यामधील ब-याचशा जागा रिक्त झालेल्या आहेत. बरेचशे बिगारी वॉलमन, फिटर, वायरमन यांची कामे करीत आहेत. त्यांना त्या पदावर नेमणूक करण्यांत यावी तसेच आरोग्याधिकारी, नगररचनाकार यासारखी महत्वाची पदे तातडीने भरणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अतिरिक्त आयुक्त यांचेसाठी कराव्या लागणा-या वेतन व इतर तदनुषंगिक खर्चाची सर्व मागणी मा.शासनाकडे करावी.

**मा.आयुक्त सो :-** खर्चाच्या बाबतीत पुर्वीचाच शासन निर्णय झालेला आहे. महासभेने या बाबतीत निर्णय घ्यावा.

**मा.श्री.संदीप कोतकर :-** हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. कामकाजाचे विकेंद्रीकरण झाले पाहीजे. हे करत असतांनाच नविन सभागृहाचे काम लवकरात लवकर करण्यात यावे.

**शहर अभियंता :-** सभागृहाचे स्लॅब सिलींगचे काम झालेले आहे. काम लवकरात लवकर करण्याबाबत काम पार पाडणारे ठेकेदार श्री.आग्रवाल यांना काम तीन महिन्यात पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

**मा.श्री.आरीफ शेख :-** यापुर्वी दर दिवसाला एक हजार दंड प्रस्तावित करणेबाबत निर्णय झाला असुन त्यावर कार्यवाही होत नाही.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** दिल्लीगेट ते पत्रकार चौक रस्त्याचे काम कोणत्या स्टेजला आहे.

**शहर अभियंता :-** लालटाकी ते पत्रकार चौक झालेल्या कामा व्यतिरिक्त २ कोटी ४६ लाख रुपयांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो यांचेकडेस पाठविण्यांत आला असुन मंजूरी नंतर निविदा मागविण्यात येतील.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** श्री.कोंडा यांना पदोन्नती देणे बाबत त्यांचे उपोषणाचे वेळी त्यांना लेखी पत्र देण्यात आले त्यावर कार्यवाही अद्याप झालेली नाही.

**मा.आयुक्त सो :-** कर्मचा-यांचे पदोन्नतीसाठीचे प्रस्ताव तयार करण्यात आलेले असुन निवड समितीपुढे निर्णयासाठी ठेवण्यात येतील १५ दिवसात निवड समितीची बैठक झालेनंतर यावर निर्णय होईल.

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदरचा विषय स्थगित ठेवणेत यावा. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ
अनुमोदक : मा.सौ.खरमाळे संगिता रत्नाकर

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ७** **दिनांक : २२ /०८ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत लाभ देण्याकरीता पुरवणी सर्वेक्षणाव्दारे तयार करण्यात आलेली दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे व मा.राज्य नागरी विकास यंत्रणेकडे पाठविण्यापुर्वी मा. सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणुन देणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :** मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचा आदेश क्र.नपप्रसं/ २००३/सर्वेक्षण/प्र.क्र.२६४/का.८३ दिनांक १ डिसेंबर २००८.

मा.शासनाच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिकेमार्फत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ देण्याकरीता दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी करणेकरीता मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचा आदेश क्र.नपप्रसं/१४/सर्वेक्षण/२००३/२६४ दि.२ एप्रिल २००५ अन्वये सन २००५-२००६ या वर्षामध्ये सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणातून एकुण ६०९७ कुटुंबांची अंतीम यादी मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या पत्र क्र.नपप्रस/२००३/सर्वेक्षण/प्र.क्र.२६४/का.८३ दिनांक १६ मे २००८ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झाली.

या यादीवर आक्षेप अर्ज स्विकारावेत असे मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा आदेश क्र.नपप्रसं/२००३/सर्वेक्षण/प्र.क्र.२६४/का.८३ दि.१६ मे २००८ अन्वये आदेशीत केले आहे. त्यानुसार दिनांक ०६/०६/२००८ ते ३१/०७/२००८ अखेर पर्यंत नागरिकांकडून आक्षेप अर्ज स्विकारले आहेत. सदर मुदतीत एकूण ३१३७ इतके अर्ज प्राप्त झाले. या आक्षेप अर्जावर करावयाच्या कार्यवाही बाबत संदर्भीय आदेशान्वये निर्देश दिले आहेत. प्राप्त ३१३७ अर्जांपैकी २५ इतके अर्ज दोन वेळा (डबल) होते. १२७ इतके अर्ज नाव दुरूस्ती करीता प्राप्त होते. दारिद्रय रेषेखालील यादीमधून नाव वगळण्याकरीता स्वत: होउन दिलेले अर्ज २, पुर्वी सर्वेक्षण झालेले अर्ज २९६ आहेत. २६८७ इतक्या कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामुळे २६८७ कुटुंबांची प्रपत्रे भरण्यात आली असून भरलेल्या प्रपत्रांपैकी ४७ इतक्या कुटुंबांनी ते दारिद्रय रेषेच्या वर (APL) असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे हार्ड कॉपी मध्ये २६४० कुटुंबांचा डेटा दिसत आहे.

पुरवणी सर्वेक्षणाच्या संगणकीकरणाचे काम पुर्ण केले असुन एकूण २६८७ अर्जाचे संगणकीकरण करुन त्या सी.डी. ची प्रत मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणा आणि त्यानंतर मा.राज्य नागरी विकास यंत्रणा यांना सादर करावयाची आहे.

सदरची सी.डी. मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे पाठविण्यापुर्वी आमसभेच्या निदर्शनास आणून द्यावे असे क्र.नपप्रसं/१४/सर्वेक्षण/२००३/२६४ दि.८ एप्रिल २००५ च्या परिपत्रकान्वये निर्देशीत केले आहे.

मा.आमसभेला या यादीमध्ये कुठल्याही कुटुंबांचा समावेश करता येणार नाही असे महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा यांनी सर्वेक्षण / क्षेत्रीय अधिकारी/ पर्यवेक्षक यांचेसाठी निर्गमीत केलेल्या सूचना पुस्तिकेतील मुद्दा क्रमांक ५५ अन्वये सूचीत केले आहे.

तरी पुरवणी सर्वेक्षणाव्दारे तयार करण्यात आलेली २६८७ कुटुंबांची यादी मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे सादर करण्यापुर्वी अहमदनगर महानगरपालिकेच्या आमसभेच्या निदर्शनास्तव सादर करणेकरीता रिपोर्ट सविनय सादर.

यावर उपायुक्त साो यांचा अभिप्राय की, सदरचा प्रस्ताव "अ" प्रमाणे मा.महासभेसमोर ठेवणेबाबत मान्यतेस सादर.

यावर आयुक्त साो यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

यावर महापौर साो यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

--**--

**चर्चा :-**

**मा.सौ.मालन ढोणे :-** दिनांक २९/०३/२०११ रोजीच्या विषय क्रमांक ७५ मधील विषयाबाबत प्रत्येक महिन्याला निदान एकतरी सभा भरवण्याबाबत आम्ही यादी दिली असतांना माझ्या पत्राचा उल्लेख का करण्यात आला नाही.

**नगरसचिव :-** मा.सदस्यांनी ज्यावेळी यादी दिली त्यावेळी विषयपत्रिका तयार करतांना मा.देशमुख साहेब नगरसचिव होते. ते आता सेवानिवृत्त झाले आहे. त्यामुळे याबाबत मला सांगता येणार नाही.

**मा.श्री.संदीप कोतकर :-** नगर शहरातील बीपीएल कार्ड धारकांचे सर्व्हेक्षण बाबत माहिती मिळणे आवश्यक आहे. संगणक सी डी बाबत सदस्यांना माहिती मिळणे आवश्यक आहे.

**श्री.मिलींद वैद्य :-** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सन २००५-२००६ साली मुळ सर्व्हे करण्यात आला. २० हजार पैकी ६ हजार अंतिम यादी मंजूरी देण्यात आली. ३१३५ हरकती अर्ज प्राप्त झाले. पुरवणी सर्व्हे स्वतंत्र अर्ज करण्यात आलेले नव्हते. दुसरा मुद्दा प्रस्तावाची माहिती संकलीत करुन सी डी तयार करावयाचे कॉलम भरुन संचालनालयाकडे पाठवावे लागेल. शासनाने कोड संचालनालयाकडे ठेवले असुन त्यामुळे सीडीवर यादी पाहणे शक्य होत नाही. बीपीएल लोकांना कार्ड देणे बाबत हे सर्व्हेक्षण फक्त लाभ देण्याकरीता आहे. पिवळया कार्ड बाबत काम जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत होवू शकते.

**मा.श्री.संदीप कोतकर :-** जिल्हाधिकारी कार्यालयाकडे बीपीएल धारक गेल्यास ते महानगरपालिकेकडे पाठवितात. अशा प्रकारे त्यांची चेष्ठा चालू आहे. आपण जर पिवळे कार्डचा लाभ लाभार्थ्यांना देवू शकत नसू तर मंजूरी देवून काय उपयोग.

**श्री.मिलींद वैद्य :-** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील लोकांना प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था महानगरपालिकेने केली आहे. त्याचा लाभ सर्वांना देत आहोत.

**मा.सौ.क्रांतीकला अनभुले :-** आम्हाला मुदत द्या काही लोकांचा यात समावेश करता येईल मगच यादी प्रसिध्द करावी.

**श्री.मिलींद वैद्य :-** हे जे सर्व्हेक्षण आहे यामध्ये कुठेही नाव नव्याने समाविष्ठ करता येणार नाही. शासनाकडुन सुजयो खालील जे प्रमाणपत्र दिले जाते ते आपण देतो.

**मा.श्री.संदीप कोतकर :-** हा विषय मंजूर करुन ज्यांची यादीत नावे आहेत अशांना लवकरात लवकर प्रमाणपत्र देण्यात यावे. गरीबांना याचा फायदा होईल. नविन सर्व्हे करता आला तर तो देखील करावा.

**मा.आयुक्त साो :-** ज्यावेळी फेरसर्व्हेक्षणाची सूचना शासनाकडुन प्राप्त होईल तेंव्हा पुन्हा विषय आपणासमोर ठेवण्यात येईल.

**--**--**

**ठराव :-**

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत लाभ देण्याकरीता पुरवणी सर्वेक्षणाव्दारे तयार करण्यात आलेली दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे व मा.राज्य नागरी विकास यंत्रणेकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.राठोड अनिता राजेंद्र
अनुमोदक : मा.सौ.खरमाळे संगिता रत्नाकर
ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ८** **दिनांक : २२ /०८ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय व संशोधन केंद्रास अनुदान देणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. (दि.२५/०३/२०११)

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

कार्यकारी विश्वस्त, अहमदनगर ऐतिहासिक वस्तूसंग्रहालय व संशोधन केंद्र, अहमदनगर यांनी दिनांक २५/०३/२०११ रोजी इकडेस पत्र देवुन विनंती केली आहे की, अहमदनगर जिल्हा इतिहास संशोधक मंडळाच्या प्रयत्नामुळे १ मे १९६० रोजी महानगरपालिकेने पुढाकार घेवून ऐतिहासिक वस्तु संग्रहालय सुरु केले आहे. मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्वतंत्र विश्वस्त मंडळ स्थापन करण्यात आले आहे. ज्येष्ठ अभिनेते सदाशिव अमरापूरकर यांचे प्रेरणेने स्टार नाईटच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या कायम निधीच्या व्याजातून कर्मचा-यांचे वेतन व दैनंदिन खर्चाची तोंडमिळवणी केली जाते. सध्या व्याजाचे दर बँकांनी कमी केल्याने संस्थेला महत्वाचे उपक्रम बंद करावे लागले. कर्मचा-यांना वेळोवेळी पगार अदा करता येत नाही. यामुळे संस्थेची आर्थिक कोंडी झालेली आहे.

ऐतिहासिक वस्तू संग्रहालयामार्फत प्रामुख्याने वस्तू जतन करणे, शाळेच्या येणा-या सहलीच्या विद्यार्थ्यांना माहिती देणे, एम.ए., एम.फील, च्या संशोधकांना उत्फुर्तपणे संदर्भ ग्रंथालय व ऐतिहासिक कागदपत्र, हस्तलिखित ग्रंथ यातील संदर्भ पुरविणे, वृत्तपत्रांना ऐतिहासिक संदर्भाच्या दृष्टीने माहिती देणे इ. कामे करावी लागतात. आर्थिक अडचणीमुळे संस्था कशीबशी चालू आहे. तरी महानगरपालिकेच्या अनुदानाशिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन नाही तसेच गेल्या ३ वर्षापासुन अनुदान मिळालेले नाही. तरी कृपया महानगरपालिकेच्या वतीने संस्थेस अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती केली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत संस्थेची घटना व रजिष्ट्रेशनची प्रत तसेच सन २००८-२००९ व २०१० चा हिशोब तपासणीच्या अहवालाची प्रत सोबत जोडली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ अन्वये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार सदर कलमातील सर्व बाबीसाठी किंवा कोणत्याही बाबीसाठी वेळोवेळी पुर्णत: किंवा अंशत: तरतुद करता येईल. अधिनियमातील कलम ६६ (२२) अन्वये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

कलम ६६(२२) :- ग्रंथालये, संग्रहालये व कलादालने, वनस्पती - संग्रहालये किंवा प्राणिसंग्रहालये स्थापन करणे, ती सुस्थिती राखणे किंवा त्यांना मदत देणे आणि त्यांच्यासाठी इमारती खरेदी करणे किंवा बांधणे.

अहमदनगर महानगरपालिकेची सन २०११-२०१२ चे अंदाजपत्रकामध्ये सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षकावर एकुण रक्कम रु.१,००,०००/- ची तरतूद करण्यात आली आहे.

महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार अधिनियमातील उक्त तरतूदीच्या अनुषंगाने अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयास आर्थिक सहयोग देता येईल. सदरची बाब धोरणात्मक असून ऐच्छिक स्वरुपाची आहे. तरी अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयास आर्थिक सहयोग देणेबाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयासाठी ठेवणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी /मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, वरील "अ" प्रस्तावित ऐतिहासीक वस्तु संग्रहालयास आर्थिक सहयोग देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी सदरचा विषय महासभेपुढे चर्चेसाठी ठेवणेत यावा.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

--**--

**चर्चा :-**

**मा.श्री.संजय चोपडा :-** शहरातील एकमेव ऐतिहासिक संग्रहालय आहे. त्याचे वैभव पुन्हा प्राप्त करुन देणे तसेच या प्रकल्पाला चालना देण्यासाठी तसेच जास्तीत जास्त मदत देण्यासाठी १ लाखाची मदत न करता ४ ते ५ लाखाची मदत देण्यात यावी.

**मा.श्री.नितीन जगताप :-** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सध्या तरी रक्कम रु १.०० लाखाची मदत देण्याची तरतुद करावी.

**मा.सौ.मालन ढोणे :-** महानगरपालिकेच्या तिजोरीत खडखडाट असल्याने ५०.०० हजाराची मदत देण्यात यावी.

**मा.श्री.सचिन पारखी :-** रु १.०० लाख माझ्या निधीतून देण्यात यावे अशी मी विनंती करतो.

**मा.श्री.संजय चोपडा :-** दाळमंडईचा रस्ता ४० फुट करावा अशी आमची मागणी आहे. कापडबाजार रस्ता ५० फुट असतांना ४० फुट केला त्याप्रमाणे आडतेबाजार रस्ता रुंदीकरण करावे. नोटीस दिल्याशिवाय कारवाई करु नका अशी मागणी आहे. दिवाळी झाल्यानंतर या विषयाबाबत निर्णय घेण्यांत यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** शहरातील अतिक्रमण मोहिम ज्या नियमानुसार असेल त्यानुसार कार्यवाही करावी. नगरकरांना मोकळा श्वास मिळणे आवश्यक आहे.

**मा.महापौर सा़ो :-** सदर संस्थेला १ लाख निधी देण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

--**--

**ठराव :-**

अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय व संशोधन केंद्रास अनुदान देणे बाबत प्राप्त झालेल्या ऑफिस प्रस्तावावर झालेल्या चर्चेनुसार एक लक्ष रुपये अनुदान देणेस मंजुरी देणेत येत आहे. नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.जगताप नितीन विलास
अनुमोदक : मा.श्री.पारखी सचिन सुभाष
ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ९** **दिनांक : २२ /०८ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका स्थायी समितीचे सदस्य मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.गणेश भोसले, मा.सौ.मुक्ता मिसाळ, मा.श्री.सुभाष लोंढे व मा.सौ.सुमनताई गंधे यांचे दिनांक १३/०७/२०११ रोजीचे पत्रानुसार मा.महिला व बालकल्याण समितीचे विसर्जन करणेकरीता प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.गणेश भोसले, मा.सौ.मुक्ता मिसाळ, मा.श्री.सुभाष लोंढे व मा.सौ.सुमनताई गंधे सदस्य स्थायी समिती यांचे दिनांक १३/०७/२०११ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाचे संदर्भानुसार विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.गणेश भोसले, मा.सौ.मुक्ता मिसाळ, मा.श्री.सुभाष लोंढे व मा.सौ.सुमनताई गंधे मा.स्थायी समिती सदस्य यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सन २००९ पासुन महिला व बालकल्याण समिती आहे. सदरची समिती ही अडीच वर्षापासुन कार्यरत आहे. "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (७) नुसार महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल" अशी तरतुद असुन त्या तरतुदी नुसार महिला व बालकल्याण समितीचे विसर्जन करणेकरीता तातडीने महासभा बोलविण्यात यावी अशा बाबत संदर्भाधीन पत्रान्वये मागणी केलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक नोव्हेंबर २००८ मध्ये झालेनंतर महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्रमांक ५ दिनांक २५/०५/२००९ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे महिला व बालकल्याण समिती सदस्य म्हणुन सोळा सदस्यांची निवड करण्यात येवून दिनांक ९/७/२००९ रोजी महिला व बालकल्याण समितीचे सभापती म्हणुन मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे व उपसभापती म्हणुन सौ.सिमा भाउसाहेब ठाकर यांची निवड मा.पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली करण्यांत आलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० नूसार महानगरपालिकेच्या विशेष समित्या स्थापना व विसर्जन बाबत खालील प्रमाणे तरतुद आहे.

३० (१) महानगरपालिकेच्या विशेष समित्या - (१) नुसार महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह ) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत. व कलम (१-अ) महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यांपैकी किमान पंच्याहत्तर टक्के सदस्य हे, महिला पालिका सदस्यांमधील असतील:

व नियम क्रमांक (७) महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण दोन महानगरपालिका स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज मधील महानगरपालिकेच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी मधील (ड) महापौर किंवा वर सांगितलेल्या प्रसंगी उपमहापौरास त्यास योग्य वाटेल तेंव्हा विशेष सभा बोलावता येईल आणि त्याने पालिका सदस्यांच्या एकुण संख्येच्या कमीत कमी एक चतुर्थांश पालिका सदस्यांनी किंवा स्थायी समितीच्या कमीत कमी चार सदस्यांनी सह्या करुन लेखी मागणी केल्यावर अशी विशेष सभा बोलावली पाहीजे आणि महानगरपालिकेची प्रत्येक सभा बोलावण्या संबंधीच्या नोटीशीत निर्दीष्ट केलेल्या विशेष कारणासाठी भरवण्यात आली पाहीजे अशी तरतुद आहे.

उपरोक्त प्रमाणे तरतुद पाहता महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल याप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचे महिला व बालकल्याण समितीचे विसर्जन करणे बाबत मा.स्थायी समिती सदस्यांचे मागणी प्रमाणे मा.महासभा बोलविणे बाबत प्रस्ताव मा.महापौर साहेब, यांचेकडेस सादर करणेस मंजूरी मिळावी हि विनंती.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.
यावर मा.आयुक्त साो, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.
यावर मा.आयुक्त साो, उपायुक्त (सा) यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

--**--

**चर्चा :-**

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.
मा.सौ.गंधे सुमन :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.

--**--

**ठराव :-**

मा.महिला व बालकल्याण समितीचे विसर्जन करणेकरीता प्राप्त झालेल्या ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मा.महिला व बालकल्याण समितीस विसर्जन करणेस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही सत्वर करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ
अनुमोदक : मा.सौ.गंधे सुमन मोहनीराज
ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.